# गीतासार



### अध्याय ७
## ज्ञानविज्ञानयोगः

तेषां ज्ञानी नित्ययुक्त एकभक्तिर्विशिष्यते । प्रियो हि ज्ञानिनोऽत्यर्थमहं स च मम प्रियः ॥ ७-१७ ॥

त्यांपैकी नेहमी माझ्या ठिकाणी ऐक्य भावाने स्थित असलेला अनन्य प्रेम-भक्ती असलेला ज्ञानी भक्त अति उत्तम होय. कारण मला तत्त्वतः जाणणाऱ्या ज्ञानी माणसाला मी अत्यंत प्रिय आहे आणि तो ज्ञानी मला अत्यंत प्रिय आहे. ॥ ७-१७ ॥

उदाराः सर्व एवैते ज्ञानी त्वात्मैव मे मतम् । आस्थितः स हि युक्तात्मा मामेवानुत्तमां गतिम् ॥ ७-१८ ॥

हे सर्वच उदार आहेत. परंतु ज्ञानी तर साक्षात माझे स्वरूपच आहे, असे माझे मत आहे. कारण तो माझ्या ठिकाणी मन-बुद्धी असणारा ज्ञानी भक्त अतिउत्तम गतिस्वरूप अशा माझ्यामध्येच चांगल्या प्रकारे स्थित असतो. ॥ ७-१८ ॥

बहूनां जन्मनामन्ते ज्ञानवान्मां प्रपद्यते । वासुदेवः सर्वमिति स महात्मा सुदुर्लभः ॥ ७-१९ ॥

पुष्कळ जन्मांच्या शेवटच्या जन्मात तत्त्वज्ञान झालेला पुरुष सर्व काही वासुदेवच आहे, असे समजून मला भजतो, तो महात्मा अत्यंत दुर्मिळ आहे. ॥ ७-१९ ॥

कामैस्तैस्तैर्हृतज्ञानाः प्रपद्यन्तेऽन्यदेवताः । तं तं नियममास्थाय प्रकृत्या नियताः स्वया ॥ ७-२० ॥

त्या त्या भोगांच्या इच्छेने ज्यांचे ज्ञान हिरावून घेतले आहे असे लोक आपापल्या स्वभावाने प्रेरित होऊन, निरनिराळे नियम पाळून इतर देवतांची पूजा करतात. ॥ ७-२० ॥

# मानवी अंतराळ उड्डाण दिन



१२ एप्रिल रोजी जग ६३ वा आंतरराष्ट्रीय मानवी अंतराळ उड्डाण दिन साजरा करेल. २०११ मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने (UNGA) १२ एप्रिल हा दिवस मानवी अंतराळ उड्डाण दिन म्हणून साजरा करण्याचा ठराव मंजूर केला.

हा दिवस मानवजातीसाठी अंतराळ युगाच्या सुरुवातीस, अंतराळ विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या योगदानाला आणि शांततापूर्ण उद्देशांसाठी बाह्य अवकाशाच्या संवर्धनाची खात्री करण्यासाठी समर्पित आहे.

त्याचा इतिहास १९६१ पासून सुरू होतो जेव्हा १२ एप्रिल १९६१ रोजी सोव्हिएत अंतराळवीर युरी गागारिन यांनी पहिले यशस्वी मानवी अंतराळ उड्डाण पूर्ण करून इतिहास रचला. त्यांनी व्होस्टोक १ अंतराळयानात १०८ मिनिटे पृथ्वीभोवती प्रदक्षिणा घातली, २७,४०० किलोमीटर प्रति तास वेगाने प्रवास केला. हे विकास दुसऱ्या महायुद्धानंतर आणि त्यानंतर झालेल्या शीतयुद्धाच्या पार्श्वभूमीवर घडले आणि त्यामुळे भविष्यातील अंतराळ संशोधनाचा मार्ग मोकळा झाला.

१९६१ मध्ये झालेल्या ऐतिहासिक मानवी अवकाश भेटीनंतर अनेक महान कामगिरी साध्य झाल्या. १९६३ मध्ये, रशियन अंतराळवीर व्हॅलेंटिना तेरेशकोवा पृथ्वीभोवती फिरणारी पहिली महिला बनली. १९६९ मध्ये, नील आर्मस्ट्राँग चंद्रावर पाऊल ठेवणारी पहिली व्यक्ती बनली. आणि तेव्हापासून, या दिवशी जगभरातील लोक युरी गागारिनच्या अंतराळातील धाडसी प्रवासाचे स्मरण करून सोव्हिएत अंतराळवीराचा विजय आणि धाडस साजरे करतात.

UNGA बाह्य अवकाशाचे फायदे ओळखते आणि मानवजातीच्या समान हिताची कबुली देते. अवकाश संशोधनाने आपल्याला नेव्हिगेशन, दळणवळण आणि हवामान अंदाज यासारख्या विविध क्षेत्रात मदत केली आहे.

### इस्रोचा उदय

गेल्या वर्षी ऐतिहासिक गगनयान मोहिमेचे प्रक्षेपण केल्यानंतर, भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्रो) २०३५ पर्यंत देशातील पहिले अंतराळ स्थानक स्थापन करण्याची आणि २०४० पर्यंत चंद्रावर मानव पाठवण्याची योजना आखत आहे. फेब्रुवारीच्या अखेरीस, इस्रोने भारताच्या मानवी अंतराळ उड्डाण कार्यक्रम, गगनयानसाठी निवडलेल्या पहिल्या चार अंतराळवीरांची घोषणा केली.

इस्रोचे मुख्यालय तिरुअनंतपुरम येथील विक्रम साराभाई अंतराळ केंद्रात झालेल्या कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गट कॅप्टन प्रशांत बालकृष्णन नायर, अजित कृष्णन आणि अंगद प्रताप आणि विंग कमांडर शुभांशू शुक्ला यांना पदनाम अंतराळवीर-विंग बॅज प्रदान केले.

२०२३ मध्ये इस्रोने अनेक यश मिळवले आहेत ज्यात रोबोटिक चांद्रयान-३ मोहिमेद्वारे चंद्रावर उतरणे आणि पृथ्वी-सूर्य लॅग्रेंज पॉइंट १ वर आदित्य-१ सौर प्रोब प्रक्षेपित करणे समाविष्ट आहे.

## वाचकांचे मनोगत

### सरकारी रुग्णालये सेवा सुविधांनी परिपूर्ण व्हायला हवीत !

खाजगीत वैद्यकीय उपचार घेणे खूपच महाग झालंय अगदी उच्च मध्यमवर्गी यांचाही कणा मोडणारे तर सामान्यांचा विचारच नको. ज्यांना खाजगी उपचार परवडत नाही अशांनी सरकार रुग्णालयात उपचार घ्यावेत हा सोपा मार्ग पण एक तर सरकारी रुग्णालयांची संख्या पाहता अत्यंत अपुरी पडतेय (किंबहुना जे जे, के ई एम, कामा, सायन आदी सरकारी निमसरकारी सारखी हॉस्पिटल कित्येक वर्षात निर्माण झालेली नाही हे सत्य नाकारता येत नाही) तेथील वैद्यकीय सेवा सुविधांचा अभाव, डॉक्टरांसह मानवी शक्तींची कमतरता, आधुनिकतेकडे दुर्लक्ष, कारणे अनेक असू शकतात परंतु सर्वप्रथम या प्राथमिक गरजांकडे लक्ष देणे अत्यंत गरजेचे असून सरकारी रुग्णालयांची स्थिती सुधारणे, त्यांच्याकडे अधिक लक्ष देऊन त्यांचे रुप पालटणे गरजेचे आहे. एकदा का तेथे व्यवस्थित सेवा मिळाली, सुविधा परिपूर्ण असतील, पेशंट आणि त्यांचे नातेवाईक यांची ओढाताण कमी झाली, सरकारी रुग्णालयातून व्यवस्थित चांगली वैद्यकीय सेवा मिळतेय याची खात्री झाल्यावर निश्चितच सरकारी रुग्णांलयाकडे लोकांचा ओढा वाढेल. मात्र त्यांची स्थिती सुधारणे गरजेचे आहे.

- विश्वनाथ पंडित, ठाणे

# वढाव येथे बहीरीदेव यात्रा



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : कोकणातील विविध देवस्थानांच्या यात्रांचा हंगाम सुरु झाला आहे. या देवस्थांनांच्या यांच्यांच्या निमीत्ताने विविध प्राचिन परंपरांची जोपासना गावागावांतून करण्यात येते. अशाच अंगावर काटेरी पेरकूट मारण्याची प्रथा असलेल्या पेण तालुक्यातील प्रसिद्ध वढाव गावाच्या बहीरीदेवाची यात्रा मोठ्या उत्साहात साजरी झाली.

चैत्र पोर्णीमेच्या एक दिवस अगोदर पेण तालुक्यांतील वढाव गावातील बहिरीदेवाची यात्रा भरते. गावाच्या मध्यभागी असणाऱ्या बहिरीदेवाच्या मंदिरातुन दुपारी बरोबर बारा वाजता देवाचा छबिना निघाला. या छविना सोबत शेकडो लोक भंडारा उधळत ढोल वाजवत आणि काटेरी पेरकुट स्वतःच्या अंगावर मारणारे भक्तगण सहभागी झाले होते.

पारंपारिक गीते गात महिला व पुरुष वढाव गावातून छबीना सोबत मोठे वढाव, दिव गावातील नागेश्वर देवाला भेट देवून येतात. दिव गावात या छबिन्याचे मोठ्या उत्साहाने स्वागत केले.

बहिरीदेवाच्या छबिन्यासोबत दिव गावचे ग्राम दैवत श्री नागेश्वराचा छविना काढण्यात आला. नंतर वाशी मार्गे वढाव गावात प्रवेश केल्यावर शिवनेरी मैदानात देवकाठी उभारण्याच्या शर्यती सुरु झाल्या. एकास एक सरस उंच उंच देवकाठी स्पर्धा पाहण्यासाठी परिसरातील नागरिकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली.

देवकाठी उभारण्याच्या स्पर्धा झाल्यावर राधाकृष्ण मंदिरातुन छबिना कांबळे आळी, तळेआळी मार्गे दत्तगुरू मंदिरातुन पुन्हा बहिरीदेवाच्या मंदिरात गेला. यात्रेनिमित्त छोटेमोठे पाळणे, आकर्षक दुकाने, खेळणी, मिठाई, फळे, फुले, हॉटेल, सरबते आदी दुकाने मोठ्या प्रमाणात शिवनेरी मैदानात व परीसरात मांडली होती.

बहिरीदेव हे अत्यंत जागृत देवस्थान असून नवसाला पावणारा देव अशी त्याची ख्याती आहे. या यात्रेसाठी मुंबई, ठाणे, पुणेसह महाराष्ट्राच्या कानाकोप-यातुन भाविक मोठ्या संख्येने आले होते.

या यात्रेचे वैशिष्ट्य म्हणजे देव काठ्यांची स्पर्धा आणी छबिना (पालखी) सोबत शेकडो भक्तगण आपल्या अंगावर काटेरी पेरकुट मारून घेतात.

यंदा तरूण मंडळी सह जेष्ठ मंडळी पेरकुटे मारण्यात मग्न होती यावेळी यात्रा दरवर्षी पेक्षा जास्त प्रमाणात भरली होती. बहीरीदेवाच्या लेपाचा महीमा पाहाण्यासाठी ग्रामस्थानी मोठ्या प्रणाणात हजेरी लावली होती.

### बहिरीदेवच करतो भक्तांचे रक्षण

बहिरीदेव देवस्थानची अंगावर काटेरी पेरकुटे मारुन घेण्याची परंपरा किमान १०० वर्षांची जूनी असल्याची माहिती गावांतील जेष्ठ नागरिकांनी दिली. भक्तगण पेरकुटे अंगावर मारुन घेतात त्यांची इजा वा दुखापत भक्ताला होवू नये या साठी दस्तूरखुद्द बहिरीदेवच भक्तांचे रक्षण करतो अशी श्रद्धा येथे आहे.

# महात्मा ज्योतिबा फुले यांना केडीएमसीतर्फे अभिवादन



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : थोर समाजसुधारक महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंती दिनानिमित्त कल्याण डोंबिवली महापालिका मुख्यालयात, आज त्यांच्या प्रतिमेस माहिती व जनसंपर्क विभागाचे उपआयुक्त संजय जाधव यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी उपस्थित कार्यकारी अभियंता घन:श्याम नवांगुळ, सुरक्षा अधिकारी भरत बुळे, सहा.सुरक्षा अधिकारी सुरेश पवार तसेच इतर अधिकारी व कर्मचारी वर्ग यांनी देखील महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पसुमने अर्पण करून अभिवादन केले.

कल्याण (प) येथील महात्मा फुले चौकातील, महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळयासही माहिती व जनसंपर्क विभागाचे उपआयुक्त संजय जाधव यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी क प्रभागाचे अधिक्षक ज्ञानेश्वर कंखरे त्याचप्रमाणे उपस्थित नागरीक यांनी देखील महात्मा फुले यांच्या पुतळयास पुष्पसुमने अर्पण करुन अभिवादन केले. डोंबिवली (प) येथील महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळयास ह प्रभागाचे सहा आयुक्त राजेश सावंत यांनी पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. यावेळी ह प्रभाग अधीक्षक विजय भोईर तसेच इतर अधिकारी, कर्मचारी व नागरिक यांनी देखील महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळयास पुष्पसुमने अर्पण करून अभिवादन केले.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर ज्ञान केंद्राच्या ठिकाणी चोख व्यवस्था ठेवा

### केडीएमसी आयुक्तांचे निर्देश

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण पुर्वेतील ड प्रभागानजीक उभारण्यात आलेल्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर ज्ञान केंद्राचा लोकार्पण सोहळा, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती दिनाच्या पूर्व संध्येला म्हणजे दि.13 एप्रिल रोजी सायंकाळी मान्यवरांच्या हस्ते संपन्न होत आहे. या लोकार्पण सोहळ्याच्या पूर्व तयारीच्या कामांची आढावा बैठक महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांच्या दालनात आज शुक्रवारी सकाळी संपन्न झाली. त्यावेळी आयुक्तांनी कार्यक्रम स्थळी सुरु असलेल्या आणि झालेल्या तयारीची माहिती उपस्थित अधिकारी वर्गाकडून घेतली. यावेळी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड, योगेश गोडसे, इतर संबंधित अधिकारी वर्ग, पोलीस अधिकारी, जयंती उत्सव समितीचे सुमेध हुमणे उपस्थित होते.

ज्ञान केंद्र परिसर, लोकार्पणानंतर दि. 14 तारखेला सकाळ पासून खुले राहणार असल्याने, या ठिकाणी होणाऱ्या गर्दीचे पोलीसांच्या मदतीने नीट नियोजन करावे, ज्ञान केंद्राच्या मार्गावर दिशा दर्शक फलक लावावा. ज्ञान केंद्राचे काम पूर्ण झाले आहे याची शहानिशा करावी. दि. 13 एप्रिल रोजी सायंकाळ पासून कार्यक्रम स्थळी रुग्णवाहिका व वैद्यकीय पथक तैनात ठेवावे. जनरेटर व विद्युत व्यवस्था चोख ठेवावी. अग्निशमन दलाने देखील आपल्या गाड्या पूर्व तयारीनिशी सज्ज ठेवाव्यात, अशा सुचना आयुक्तांनी यावेळी बैठकीत उपस्थित असलेल्या संबंधित अधिकारी वर्गास दिल्या.

## गीतांजली एक्स्प्रेसमध्ये
# रेल्वे कॅटरिंग कर्मचाऱ्यांची प्रवाशाला बेदम मारहाण

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : रेल्वे प्रशासनाकडून प्रवाशांना गाड्यांमध्ये जेवण व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली जाते. या सुविधेसाठी, रेल्वे प्रशासन वस्तूंची कमाल किरकोळ किमतीत (एमआरपी) विक्री करते. मात्र, गीतांजली एक्स्प्रेसमध्ये एमआरपीपेक्षा जास्त शुल्क आकारले जात असल्याच्या तक्रारीवरून रेल्वे कॅटरिंग कर्मचाऱ्यांनी एका प्रवाशाला बेदम मारहाण केली. मारहाणीचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या प्रकरणी कल्याण रेल्वे पोलिसांनी (जीआरपी) 7 जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

कोलकाताहून मुंबईला येणाऱ्या गीतांजली एक्स्प्रेसमध्ये बाटलीबंद पिण्याचे पाणी आणि खाद्यपदार्थ एमआरपीपेक्षा जास्त दराने आकारले जात होते. याबाबत एका सामाजिक कार्यकर्त्याने तक्रार केली असता आयआरसीटीसी कर्मचाऱ्यांनी त्याला बेदम मारहाण केली. ही घटना नागपूर ते बडनेरा रेल्वे स्थानकादरम्यान घडली. अंबरनाथ येथील रहिवासी सत्यजित बर्मन हे गीतांजली एक्स्प्रेसमधून मुंबईच्या दिशेने प्रवास करत होते. रेल्वेत बाटलीबंद पाणी आणि खाद्यपदार्थ चढ्या भावाने विकले जात असल्याचे त्यांनी पाहिले.

याबाबत त्यांनी आयआरसीटीसीच्या कर्मचाऱ्याला विचारणा केली असता, त्याने सहकाऱ्यांच्या मदतीने सत्यजित बर्मन यांना बेदम मारहाण केली. या संदर्भात सत्यजित बर्मन यांनी कल्याण रेल्वे स्थानकावरील 7 आयआरसीटीसी कर्मचाऱ्यां विरोधात जीआरपीकडे तक्रार दाखल केली आहे. या घटनेने आयआरसीटीसी कर्मचाऱ्यांच्या गुंडगिरीचा पुन्हा एकदा पर्दाफाश झाला आहे.

# संत निरंकारी मिशनकडून मानव एकता दिवसाचे आयोजन

### मुंबई महानगरासह देश-विदेशात ५०० ठिकाणी भव्य रक्तदान अभियान

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : आध्यात्मिकताच मानव एकता मजबूत करु शकते तसेच मानवाला मानवाच्या जवळ आणून परस्पर प्रेम व सौहार्दाचे वातावरण निर्माण करु शकते. हेच मंतव्य समोर ठेऊन सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज व निरंकारी राजपिताजी यांच्या आशीर्वादाने प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी 24 एप्रिल, रोजी दिल्लीतील ग्राउंड नं.8, निरंकारी चौक, बुराडी रोड येथे 'मानव एकता दिवस' समारोहाचे आयोजन करण्यात आले आहे. या व्यतिरिक्त देशभरातील मिशनच्या समस्त शाखांमधील भाविक भक्तगणदेखील एकत्रित येऊन बाबा गुरबचनसिंहजी आणि मिशनचे अनन्य भक्त चाचा प्रतापसिंहजी यांना आपली श्रद्धा सुमने अर्पित करतील व त्यांच्या महान जीवनातून प्रेरणा प्राप्त करतील.

संत निरंकारी मंडळाचे सचिव व समाज कल्याण विभागाचे प्रभारी जोगिंदर सुखीजा यांनी माहिती देताना सांगितले, की सतगुरुंच्या असीम कृपेने यावर्षी देखील जगभरातील सुमारे 500पेक्षा अधिक ठिकाणी संत निरंकारी मिशनची सामाजिक शाखा संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनच्या विद्यमाने रक्तदान शिबिरांच्या अविरत श्रृंखलेचे व्यापक आयोजन केले जाईल ज्यामध्ये जवळपास 50 हजार पेक्षा अधिक रक्तदाते मानवतेच्या भल्यासाठी रक्तदान करुन नि:स्वार्थ सेवेचे उदाहरण प्रसतु करतील.

मुंबई महानगर परिक्षेत्रामध्ये मानव एकता दिवसाच्या निमित्ताने 24 एप्रिल रोजी 4 ठिकाणी भव्य रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे ज्यामध्ये चेंबूर, डोंबिवली, नालासोपारा व बोईसर आदि स्थानांचा समावेश आहे. या व्यतिरिक्त मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, उरण, भाईंदर, वसई-विरार, पालघर, डोंबिवली, कल्याण, उल्हासनगर, अंबरनाथ, बदलापुर आदि परिसरामध्ये जवळपास 58 ठिकाणी 'मानव एकता दिवस' सत्संग समारोहांचे आयोजन करण्यात आले आहे.

युगप्रवर्तक बाबा गुरबचनसिंहजी समाज कल्याणासाठी सातत्याने प्रयासरत राहिले. प्रत्येक भक्ताच्या जीवनाला त्यांनी वास्तविक रूपात एक व्यावहारिक दिशा प्रदान केली ज्यासाठी मानवता त्यांची सदैव ऋणी राहील. युगदृष्टा बाबा हरदेव सिंह जी यांनी सन् 1986 पासून सुरु केलेली रक्तदान अभियानाची ही मोहिम आज महाअभियानाच्या रुपात आपल्या चरम उत्कर्ष बिंदूवर पोहचली आहे. मागील जवळपास 4 दशकांमध्ये आयोजित करण्यात आलेल्या 8644 शिबिरांमध्ये मिशनमार्फत 14 लाख 5 हजार 177 युनिट रक्त मानवमात्राच्या भल्यासाठी दिले गेले आहे आणि या सेवा निरंतर चालू आहेत.

## आरोग्य
# व्हिटॅमिन बी १२




1. दही: दही हे व्हिटॅमिन बी 12 चा चांगला स्रोत आहे. यामध्ये प्रोबायोटिक्स देखील भरपूर असतात, जे पचनसंस्था निरोगी ठेवण्यास मदत करतात.
2. मशरूम: व्हिटॅमिन बी 12 सोबतच, मशरूममध्ये इतर अनेक पोषक घटक देखील आढळतात. हे अँटीऑक्सिडंट्सचा देखील चांगला स्रोत आहे.
3. बीट: बीट हे व्हिटॅमिन बी12 चा चांगला स्रोत आहे. त्यात रक्त निर्मितीसाठी आवश्यक असलेले लोह आणि फोलेट देखील भरपूर प्रमाणात असते.
4. चीज: व्हिटॅमिन बी 12 सोबत, कॅल्शियम आणि प्रथिने देखील चीजमध्ये आढळतात. हे हाडे आणि स्नायू मजबूत करण्यास मदत करते.

व्हिटॅमिन बी 12 च्या कमतरतेची लक्षणे

•थकवा आणि अशक्तपणा,•श्वास घेण्यात अडचण येणे,• चक्कर येणे,•त्वचा पिवळी पडणे,• भूक न लागणे

वजन कमी होणे,•बद्धकोष्ठता किंवा अतिसार,• मज्जासंस्थेशी संबंधित समस्या

### व्हिटॅमिन बी 12 च्या कमतरतेवर मात करण्यासाठी उपाय

• वर उल्लेख केलेले शाकाहारी पदार्थ तुमच्या आहारात समाविष्ट करा.
• व्हिटॅमिन बी 12 सप्लिमेंट्स घ्या.
• डॉक्टरांचा सल्ला घ्या.

व्हिटॅमिन बी 12 च्या कमतरतेवर मात करण्यासाठी, शाकाहारी लोक त्यांच्या आहारात काही बदल करून या समस्येपासून मुक्त होऊ शकतात. जर तुम्हाला व्हिटॅमिन बी 12 च्या कमतरतेची लक्षणे दिसली तर ताबडतोब डॉक्टरांचा सल्ला घ्या.

# शहापूरच्या प्रेम कामडीने पटकावले डॉ. होमी भाभा स्पर्धेतील ब्रॉंझ मेडल




> स्पर्धा संपली असली तरी यातील अनुभवाचा मला भविष्यात नक्कीच उपयोग होणार आहे. येणाऱ्या काळात ६ वी व ९ वीच्या विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे आणि विज्ञानाशी गट्टी करून काहीतरी वेगळं करून दाखवावे.
> – प्रेम गोविंद कामडी, डॉ.होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा ब्रांझ पदक विजेता

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापुर : छत्रपती शिक्षण संस्था संचलित अभिनव न्यू इंग्लिश मिडीयम स्कूल (एचएमएस), आसनगाव येथील इयत्ता ९ वीमध्ये शिक्षण घेत असलेला प्रेम गोविंद कामडी या विद्यार्थ्याने डॉ.होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा २०२४-२५ मध्ये संपूर्ण महाराष्ट्रातून कांस्य पदक (ब्रांझ मेडल) पटकावून शाळेसह संपूर्ण शहापूर तालुक्याचे नाव उज्ज्वल केले आहे.

मुंबई सायन्स टीचर्स असोसिएशनच्या माध्यमातून दरवर्षी ही मानाची स्पर्धा इयत्ता ६ वी आणि ९ वीच्या विद्यार्थ्यांसाठी संपूर्ण महाराष्ट्रात आयोजित केली जाते. या वर्षी ८८ हजार २०३ बालवैज्ञानिकांनी सहभाग घेतलेला असताना त्यामधून विविध टप्प्यांतून पार होत प्रेम कामडीने अंतिम फेरीत आपले वेगळेपण सिद्ध केले.

सदर स्पर्धा एकूण चार टप्प्यांत राबवली जाते. पहिल्या टप्प्यात लेखी परीक्षा घेतली जाते, ज्यातून केवळ साडेसात टक्के विद्यार्थी पुढील टप्प्यासाठी पात्र होतात. दुसऱ्या टप्प्यात प्रात्यक्षिक परीक्षा होते, तिथून केवळ दहा टक्के विद्यार्थ्यांची निवड कृती संशोधनासाठी केली जाते. त्यानंतर या विद्यार्थ्यांनी स्वतःचा कृती प्रकल्प तयार करून त्यावर सादरीकरण करायचे असते. शेवटी चौथ्या टप्प्यात मुलाखतीद्वारे अंतिम विजेते निवडले जातात.या स्पर्धेच्या अंतिम टप्प्यात प्रेमने एआय तंत्राचा शेतीसाठी उपयोग" या विषयावर सखोल कृती संशोधन करून आपला प्रबंध प्रभावी पद्धतीने सादर केला. त्याच्या या अभिनव आणि उपयोगी संकल्पनेने परीक्षकांची मनं जिंकली आणि त्याला इंग्रजी माध्यम विभागातून महाराष्ट्र पातळीवर कांस्य पदक मिळाले.या यशामागे प्रेमच्या आई-वडिलांची साथ आणि प्रोत्साहन हे मोलाचे ठरलेच पण त्याचबरोबर विषय शिक्षिका लता विशे,जिनल सोनवणे,राजा घरत या शिक्षकांचे मार्गदर्शन व मुख्याध्यापक पद्माकर फर्डे यांचे खंबीर पाठबळही महत्वाचे ठरले. प्रकल्प तयार करताना आयटी विभागातील विद्यार्थी कुमार : प्रतुष मिश्रा याचे तांत्रिक सहकार्यही प्रेमला लाभले.या उल्लेखनीय यशामुळे अभिनव न्यू इंग्लिश मिडीयम स्कूलच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला असून संस्थेचे अध्यक्ष ज्ञानेश्वर तळपाडे,सचिव संतोष चौधरी यांनीही प्रेमचे मनापासून कौतुक केले आहे.या यशाबद्दल तालुक्यात सर्वत्र गौरव केला जात असून तो इतर विद्यार्थ्यांसाठी आदर्श ठरत आहे.

news.thanejeevandeep@gmail.com
दैनिक ठाणे जीवनदीप WhatsApp Channels
महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक
दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर
मुख्य संपादक : रवींद्र नारायण घोडविंदे
कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम. डी.)
9619188558 / 9082664781
www.jeevandeepvarta.com/
आपलं हक्काचं दैनिक, दररोज वाचा.

# अनधिकृतपणे शेतमालाची आयात करणाऱ्या व्यापाऱ्यांवर नवीमुंबई बाजार समितीची कारवाई

## दक्षता पथकाकडून ११ लाखाची दंड वसुली




दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी मुंबई :** मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीने उत्पन्न वाढीसाठी कारवाई सुरू केली आहे. एक नवीन दक्षता पथक तयार करण्यात आले आहे. या दक्षता पथकाने गेल्या १० दिवसांत बाजार समितीचा बाजार फी न भरता मोठ्या प्रमाणात शेतमालाचा अनधिकृतपणे आयात करणाऱ्या आयातदारांवर कारवाई करून११ लाखाची दंड वसुली केली आहे.

समितीच्या सभापतीपदी प्रभू पाटील यांनी पदभार स्वीकारल्यापासून बाजार समितीच्या उत्पन्न वाढीसाठी ही कारवाई सुरू केली आहे. अनधिकृतपणे व्यापार करणारे आयातदार बाजार समितीच्या विना अनुज्ञप्ती शिवाय व्यवसाय करत होते. या आयातदारांच्या आणि व्यापाऱ्यांच्या, बाजार फी बुडवणाऱ्या गाड्या पथकाकडून पकडण्यास सुरुवात करण्यात आली आहे. या गाड्यांमध्ये मोठ्या कंटेनरचा समावेश आहे. या मालाची किंमत जवळपास ६ कोटींच्या घरात आहे. पथकाने पकडकेल्या वाहनामध्ये वेलची, लवंग, बासमती तांदूळ, चवळी, सूर्यफूल, नाचणी आणि राजमाचा समावेश असून आतापर्यंत जळपास ११ लाखाची दंड वसुली करण्यात आली आहे. यामुळे बाजार समितीच्या विना परवानगीने, मालाची आयात, निर्यात आणि किरकोळ व्यवसाय करणाऱ्या व्यापाऱ्यांमध्ये या दक्षता पथकाची दहशत निर्माण झाली आहे.

दक्षता पथकाच्या कारवाईची भीती व्यापाऱ्यांमध्ये निर्माण झाली आहे, आणि त्यामुळे त्यांचे धाबे दणाणले आहेत. या पथकामध्ये मुंबई बाजार समितीचे सचिव पी एल खंडागळे यांच्या मार्गदर्शनाखाली उप सचिव महेश साळुंके पाटील, अनंत पारदुले, संजय खांडेकर, अजित नारंगकर, विनीत उबाळे यांचा समावेश आहे. त्यामुळे व्यापाऱ्यांनी अशा प्रकारे अनधिकृतपणे व्यापार, आयात आणि निर्यात करण्यापेक्षा बाजार समितीची अनुज्ञप्ती घेवून व्यापार करावा असे आवाहन सभापती प्रभू पाटील यांनी केले आहे.



# नवी मुंबई मनपावर थकित मालमत्ता कराचा बोजा कायम

## आर्थिक वर्ष संपूनही दोन हजार कोटींची थकबाकी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी मुंबई :** गेल्या आर्थिक वर्षात ८०० कोटी रुपयांच्या मालमत्ता कर वसुलीचा टप्पा गाठत स्वतःची पाठ थोपटवून घेणाऱ्या नवी मुंबई महापालिकेवर जवळपास दोन हजार कोटी रुपयांच्या थकित मालमत्ता कराचे ओझे अजूनही कायम आहे. मालमत्ता कराची रक्कम थकविणारे उद्योजक आणि व्यावसायीकांची मानगुट आवळणाऱ्या या विभागाने मूळ गावठाण, गावठाण विस्तार योजनेतील भूखंड आणि सिडको वसाहतीत रहाणाऱ्या मालमत्ता धारकांकडून येणे असलेल्या शेकडो कोटी रुपयांकडे गेली अनेक वर्ष अक्षरशः कानाडोळा केल्याचे चित्र सध्या दिसत आहे.

मूळ गावठाणातून व्याजासह ३१२ कोटी तर सिडको वसाहतीमधील रहिवाशांकडून ६२ लाख रुपयांची थकबाकी कायम असल्याने यंदाच्या आर्थिक वर्षात या रकमेच्या वसुलीसाठी महापालिका प्रशासन काय करते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

राज्यातील श्रीमंत महापालिकांमध्ये गणल्या जाणाऱ्या नवी मुंबई महापालिकेचा मालमत्ता कर हा उत्पन्नाचा प्रमुख स्रोत आहे. गेल्या काही वर्षांपासून सिडको तसेच खासगी वसाहतींच्या पुनर्विकासाचे वारे शहरात वाहू लागले आहेत. त्यामुळे या माध्यमातून मोठा महसूल महापालिकेस मिळेल अशी शक्यता आहे. नव्या इमारती उभ्या रहातील तशा तेथील सदनिकांचा करही वाढेल. त्यामुळे महापालिकेच्या तिजोरीत कोणत्याही करवाढीशिवाय मोठा महसूल जमा होत राहील.

हे लक्षात आल्याने आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी नव्या आर्थिक वर्षात मालमत्ता करापोटी एक हजार कोटी रुपये जमा होतील असे उद्दिष्ट आखून घेतले आहे. महापालिका प्रशासनाने शहरातील नव्या मालमत्तांचा शोध घेणे तसेच वाढीव बांधकामांची माहिती मिळविण्यासाठी मध्यंतरी लिडारद्वारे एक सर्वेक्षणही केले होते. या सर्वेक्षणाचा सविस्तर अहवाल महापालिकेकडे आहे. मात्र त्यातील नोंदीत अनेक त्रुटी असल्याचे लक्षात आल्याने महापालिका प्रशासनाने या नव्या सर्वेक्षणानुसार कर आकारणीचा वेग वाढविलेला नाही.

सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार महापालिका हद्दीत असलेल्या मूळ गावठाण परिसरातून व्याजाच्या रकमेसह मालमत्ता कर विभागाला ३१२ कोटी ६६ लाखांचा कर येणे आहे. याच भागात गावठाण विस्तार योजनेच्या माध्यमातून सिडकोने वाटप केलेल्या भूखंडांचे १४४ कोटी ७१ लाख रुपयांचा कर अजूनही महापालिकेच्या तिजोरीत जमा झालेला नाही. सिडकोच्या भूखंडांचे ११९३ कोटींचा कर भरणा वेगवेगळ्या कारणांमुळे वादात सापडला आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अखत्यारित येणाऱ्या भूखंडांचे ७४० कोटी महापालिकेकडे थकबाकीच्या यादीत मोजले जात आहे.

सिडको आणि एमआयडीसी भूखंडांवर करण्यात आलेली कर आकारणीची काही प्रकरणे न्यायालयीन प्रक्रियेत आहेत. मात्र मूळ गावठाण आणि सिडकोच्या सदनिकाधारकांचे ६३ लाख रुपये वसूल करण्याचे धारिष्ट्य महापालिकेला का दाखविता आलेले नाही या प्रश्नांचे उत्तर मात्र गुलदस्त्यात आहे. विशेष म्हणजे या दोन्ही भागात मोठ्या प्रमाणावर बेकायदा बांधकामे सुरु आहेत. या बांधकामांना दंडासह कर आकारणी करणे गरजेचे आहे.

सिडकोने अल्प उत्पन्न गटातील रहिवाशांसाठी उभारलेली बैठी घरे तसेच वसाहतींमध्ये मोठ्या प्रमाणावर बेकायदा बांधकामे तसेच वापर बदल करण्यात आले आहेत. अनेक ठिकाणी दुकाने सुरू झाल्याने व्यावसायिक वापर तर राजरोस सुरू आहे. अशा मालमत्तांची साधी माहितीही महापालिकेकडे नाही असे चित्र आहे.

### आरटीईच्या दुसऱ्या प्रतिक्षा यादीत

# ठाणे जिल्ह्यातून ९५५ विद्यार्थ्यांची निवड

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** - शिक्षण हक्क कायदा (आरटीई) अंतर्गत प्रवेश प्रक्रिया सुरु असून मंगळवरी दुसरी प्रतिक्षा यादी जाहीर करण्यात आली आहे. ठाणे जिल्ह्यातून दुसऱ्या प्रतिक्षा यादीत ९५५ विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. या यादीत निवड झालेल्या विद्यार्थ्यांना १५ एप्रिलपर्यंत प्रवेश घेण्यासाठी मुदत देण्यात आली आहे. यासाठी विद्यार्थ्यांच्या पालकांना त्यांच्या दुरध्वनी क्रमांकावर संदेश पाठविण्यात येत आहे, अशी माहिती शिक्षण विभागाने दिली आहे.

बालकांचा मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ नुसार, दरवर्षीप्रमाणे यंदाही २५ टक्के प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने राबविण्यात येत आहे. ठाणे जिल्ह्यात ११ हजार ३२२ जागांसाठी २५ हजार ७७४ विद्यार्थ्यांचे अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी १० हजार ४२९ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली होती. परंतू, निवड झालेल्या विद्यार्थ्यांपैकी केवळ ६ हजार ७१३ विद्यार्थ्यांनीच प्रवेश निश्चित केले. त्यामुळे उर्वरित जागांसाठी प्रतिक्षा यादीतील मुलांना संधी देण्यात आली. त्यानुसार, प्रतिक्षा यादी १ मध्ये २ हजार ७०५ विद्यार्थ्यांची निवड झाली. प्रतिक्षा यादीतील विद्यार्थ्यांना प्रवेश घेण्यासाठी दोन वेळा मुदत देऊन देखील त्यातील केवळ १ हजार १८२ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले.

त्यानंतर, उर्वरित जागांसाठी ८ एप्रिल रोजी आरटीईची दुसरी प्रतिक्षा यादी जाहीर करण्यात आली. यात, ९५५ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. या विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश घेण्यासाठी १५ एप्रिलपर्यंत मुदत देण्यात आली आहे. दुसऱ्या प्रतिक्षा यादीत निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांना संदेश पाठविण्यात आले आहेत. त्यामुळे पालकांनी हे संदेश पाहून आपल्या पाल्याचा शालेय प्रवेश निश्चित करावा असे आवाहन शिक्षण विभागाकडून करण्यात आले आहे.

### पालकांनी केवळ संदेशावर अवलंबून राहू नये

पालकांनी केवळ संदेशावर अवलंबून न राहता आरटीईच्या अधिकृत संकेतस्थळावरील 'अर्जाची स्थिती' या टॅबवर आपल्या बालकांचा अर्ज क्रमांक टाकून अर्जाची स्थिती पहावी. तसेच वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे अवलोकन करावे. प्रतिक्षा यादीतील बालकांच्या पालकांनी अलोटमेंट लेटर आणि आवश्यक कागदपत्रे घेऊन विहित मुदतीत नजिकच्या पडताळणी केंद्रावर जाऊन पडताळणी समितीकडून कागदपत्रांची तपासणी करून आपल्या बालकांचा ऑनलाईन प्रवेश निश्चित करावा, असे आवाहन प्राथमिक शिक्षणाधिकारी बाळासाहेब राक्षे यांनी केले आहे.

### दुसऱ्या प्रतिक्षा यादीतील ८६ विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित

आरटीईची दुसरी प्रतिक्षा यादी ८ एप्रिलला जाहीर झाली असून यामध्ये ९५५ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. ८ एप्रिल ते १० एप्रिल या तीन दिवसाच्या कालावधीत ९५५ विद्यार्थ्यांपैकी ८६ विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाली असल्याची माहिती आरटीईच्या अधिकृत संकेतस्थळावर देण्यात आली आहे.



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कोन गावातील बनावट विदेशी दारू च्या ठिकाणा वर पोलिसांची कारवाई..गोदामातील विदेशी दारू वाईन्स शॉप वर सप्लाय करताना दारू वाहतूक करणाऱ्या वाहनांच्या मालक- चालकान कडून गाडीतील विदेशी दारू च्या बाटल्यांचे झाकण काढून त्यातली ओरिजिनल दारू काढून घेऊन त्याच बाटली मधे केमिकल युक्त दारू भरून ती भेसळ युक्त दारू वाइन शॉप वर मोठ्या प्रमाणात सप्लाई केली जात होती. भेसळ युक्त दारू पियून अनेक लोकांचे आरोग्य धोक्यात आले होते.कोन गावात बऱ्याच ठिकाणी अशे बनावट दारू चे अड्डे असून पोलिसांनी अशा बनावट दारू विक्रीच्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात कारवाई सुरू केली आहे..




# रद्द केलेल्या भूखंडांचा महिनाभरात लिलाव

## तीन हजार कोटींची सिडकोने कसली कंबर

> सिडको मंडळाने ज्या १६ भूखंडांचे वाटप रद्द केले त्या भूखंडधारकांना चार वर्षात भूखंडावरील विकास करुन भोगवटा प्रमाणपत्र सिडकोकडून मिळवायचे होते. मात्र काही भूखंडांवर विकास न केल्याने तसेच काही भूखंडांवर भोगवटा प्रमाण न घेतल्याने सिडकोने या भूखंड धारकांना अडीचशे कोटी रुपयांचा अतिरिक्त भाडेपट्टामुल्य भरण्याची नोटीस अनेकदा बजावली. अभय योजनेत ५० टक्के सवलतीनुसार सव्वाशे कोटी रुपये भरुन संबंधित भूखंडधारकांना पुन्हा या भूखंडावर काम करण्याची सवलत मिळणार होती. मात्र वेळीच सिडकोने जाहीर केलेल्या अभय योजनेकडे दुर्लक्ष केल्याचे या भूखंड धारकांना भोवले आहे. सध्या या भूखंडांचे बाजारमूल्य तीन हजार कोटी असल्याचे बोलले जात आहे.

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी मुंबई :** वर्षानुवर्षे भूखंडाचा ताबा राखूनही त्याचा नियोजित वापर टाळणाऱ्या १८ मोठ्या भूखंडांचा ताबा सिडकोने गेल्या आठवड्यात रद्द केला. मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या घाऊक बाजारांच्या लगत असलेले काही मोठे भूखंडही सिडकोने रद्द केले. रद्द केलेल्या या भूखंडांचा जाहीर लिलाव करण्याची प्रक्रिया सिडकोने तातडीने सुरू केली असून यासंबंधीची जाहीरातही प्रसिद्ध केली आहे.

सिडको महामंडळाकडून भूखंड मिळवल्यानंतर त्यावर कोणतेही बांधकाम न करणे, बांधकाम सुरू केल्यानंतरही भोगवटा प्रमाणपत्र घेण्यात टाळाटाळ करणे असे प्रकार यापूर्वीच उघडकीस आले आहेत. अशा एकूण १६ भूखंडांचे वाटप रद्द केल्यानंतर सोमवारी एकाच दिवशी तब्बल १३ भूखंडांचा ताबा सिडकोच्या शहर सेवा विभागाने घेतला.

लगेच मंगळवारी संबंधित १३ भूखंड लिलाव करत असल्याची जाहिरात सिडकोने प्रसिद्ध केली. लवकरच भोगवटा प्रमाणपत्र घेण्यात टाळाटाळ करणाऱ्या ५० इमारतींवर अशाच पद्धतीने कारवाई करण्याच्या हालचाली सिडकोत सुरू आहेत. महिन्याभरात संबंधित रद्द केलेल्या भूखंडांचा लिलाव करुन सिडकोच्या तिजोरीत तीन हजार कोटी रुपये जमा करण्यासाठी सिडकोने कंबर कसली आहे.

सिडकोचे शहर सेवा विभाग एक मधील ११ आणि शहर सेवा तीन मधील ५ अशा भूखंडांवर ही कारवाई करण्यात आली आहे. शहर सेवा विभागाच्या प्रमुखांच्या उपस्थितीमध्ये सहा वेगवेगळ्या पथकाने पोलिसांच्या मदतीने सोमवारी भूखंड ताब्यात घेण्याची प्रक्रिया राबवली. लगेच मंगळवारी सिडकोच्या पणन विभागाने निवासी, वाणिज्यिक, गोदाम व वेअरहाऊसिंग आणि सामाजिक सेवेतील भूखंड ई-लिलावाची जाहिरात प्रसिद्ध केली.

सिडकोने रद्द केलेल्या भूखंडांनंतर तिघा मालकांनी तातडीने न्यायालयात धाव घेतल्याने तीन भूखंडधारक सोमवारच्या कारवाईतून बचावले. लिलावात काढलेल्या भूखंडांमध्ये ९ भूखंड वाणिज्यिक व निवासी भूखंड विकसकांसाठी लिलावात काढले. तर ४ भूखंड सामाजिक सेवेकरीता राखीव आहेत. यामध्ये रुग्णालय, वसतीगृह अशा भूखंडांचा समावेश आहे.

# राज्य पेसा संचालकांचा ठाणे जिल्ह्यात दौरा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे ; दि. 11 :** दिनांक 08 व 09 एप्रिल, 2025 रोजी, राज्य पेसा कक्ष, ग्राम विकास विभाग, पुणे येथील संचालक शेखर शंकर सावंत यांच्या अध्यक्षतेखाली ठाणे जिल्ह्यातील पेसा क्षेत्रातील ग्रामपंचायतींचा क्षेत्रीय दौरा यशस्वीरित्या पार पडला.

यामध्ये जिल्हा परिषद, ठाणे येथे आढावा बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीस उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) प्रमोद काळे, राज्य पेसा समन्वयक अतुल गाडे, जिल्हा व्यवस्थापक संजय धसाडे, सर्व तालुका व्यवस्थापक (पेसा) तसेच इतर संबंधित अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत पेसा कायदा 1996 अंतर्गत तयार करण्यात आलेल्या पेसा नियमांची अंमलबजावणी, तसेच पेसा 5% थेट निधी बाबत सविस्तर आढावा घेण्यात आला आणि अंमलबजावणी प्रक्रियेतील अडचणी व उपाययोजना यावर चर्चा करण्यात आली. या दौरा दरम्यान ग्रामपंचायत शिरोळ (ता. शहापूर) येथे क्षेत्रीय भेट घेण्यात आली. यावेळी ग्रामस्थांनी पारंपरिक आदिवासी नृत्य सादर करून संचालकांचे स्वागत केले. यानंतर ग्रामसभा, विविध समित्यांसोबत संवाद साधून पेसा कायद्याच्या अंमलबजावणी संदर्भात मार्गदर्शन करण्यात आले. तसेच 5% थेट निधी योजनेअंतर्गत ग्रामनिहाय दप्तर तपासणी व प्रत्यक्ष कामांची पाहणी देखील करण्यात आली.

त्यानंतर ग्रामपंचायत कसारा खुर्द येथे भेट देऊन संचालक यांनी ग्रामसभा कोष समिती सदस्यांसह चर्चा केली. या वेळी संबंधित योजनेचे सर्व अभिलेख, नोंदवह्या आणि प्रत्यक्ष कामांची तपासणी करण्यात आली. या दौऱ्यात गटविकास अधिकारी कल्याण पंडित राठोड, तालुका स्तरीय विस्तार अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. हा दौरा पेसा कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीस चालना देणारा ठरला असून, पेसा क्षेत्रातील विकास प्रक्रियेला बळकटी देण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरला आहे

# जूचंद्र येथे संपन्न होणार चंडिका मातेचा चैत्रोत्सव

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वसई :** नायगाव पूर्वेतील जूचंद्र येथील सुप्रसिद्ध श्री चंडिका मातेच्या चैत्र यात्रोत्सवाला १५ एप्रिल पासून सुरुवात होणार आहे. १५ ते १७ एप्रिल असा तीन दिवस हा चैत्र यात्रोत्सव चालणार असून निमित्ताने चंडिका देवी न्यासातर्फे विविध कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडणार आहेत. श्री चंडिका मातेच्या दर्शनासाठी ठाणे, मुंबई, भिवंडी, पालघर, वसई विरार यासह अनेक भागातून भाविक भक्त येतात. मागील काही वर्षांपूर्वी य मंदिराला जिल्हा नियोजन कडून तीर्थ क्षेत्राचा दर्जा मिळाला असल्याने भाविक भक्तांची संख्या दिवसेंदिवस वाढू लागली आहे.

# ऐन उन्हाळात डोंबिवली रेल्वे स्थानकातील पंखे गायब

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली** - डोंबिवली रेल्वे स्थानकातील फलाट क्रमांक तीन आणि चारवर कल्याण दिशेकडील बाजुत पंखे नसल्याने प्रवासी घामाघुम होत आहेत. यासंदर्भात अनेक प्रवाशांनी स्थानिक रेल्वे अधिकाऱ्यांकडे तक्रारी केल्या आहेत. विविध भागातून डोंबिवली रेल्वे स्थानकात येणारे प्रवासी फलाटावर आल्यावर पंखे शोधत अंगाची तलखी शमविण्याचा प्रयत्न करतात. परंतु, रेल्वे स्थानकातील फलाट क्रमांक तीन आणि चार कल्याण दिशेने पंखे नसल्याने प्रवासी तीव्र नाराजी व्यक्त करत आहेत.

फलाटावरील चार ते पाच डबे येत असलेल्या भागात पंखे नाहीत. पंखे असलेल्या भागात उभे राहून लोकल आली की धावत जाऊन फलाटावरील गर्दीमुळे प्रवाशांना शक्य होत नाही. त्यामुळे प्रवासी हातामधील रुमाल, पेपराची घडी करून फलाट क्रमांक तीन आणि चारवर कल्याण दिशेने उभे राहून अंगाची तलखी शमविण्याचा प्रयत्न करतात. कडक उन्हाळ्याचे दिवस सुरू आहेत. डोंबिवली रेल्वे स्थानकातील पाचही फलाटांवर, तिकीट खिडक्यांच्या ठिकाणी प्रवासी पंखा असलेल्या ठिकाणी झुंडीने उभी राहून थंड हवेचा स्वाद घेतात. असे चित्र फलाटांवर जागोजागी दिसत आहे. मात्र, फलाट क्रमांक तीन आणि चारवर कल्याण दिशेने चार ते पाच डबे येणाऱ्या ठिकाणी पंखे नाहीत. प्रवाशांची कुचंबणा होत आहे.

फलाट क्रमांक तीन आणि चारवरील कल्याण दिशेकडील बाजु रेल्वेकडून विस्तारित करण्यात आली आहे. या फलाटावर सरकत्या जिन्याचे काम अनेक महिन्यांपासून रखडलेले आहे. रेल्वे अधिकारी याविषयी उघडपणे काही बोलत नाहीत. या रखडलेल्या कामाचा त्रास फलाट क्रमांक तीन आणि चारवरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना होतो. फलाट क्रमांक तीनवरून मुंबईला जाणाऱ्या धिम्या लोकल धावतात. बहुतांशी प्रवासी या लोकलने प्रवास करत असल्याने प्रवाशांची सर्वाधिक गर्दी फलाट क्रमांक तीनवर असते.

याशिवाय फलाट क्रमांक चारवरून कर्जत, कसारा, आसनगाव, बदलापूर, अंबरनाथ, खोपोलीकडे जाणाऱ्या अति जलद लोकल धावतात. दूरवर राहणारा हा प्रवासी अति लोकलला सर्वाधिक प्राधान्य देतो. फलाट क्रमांक चारवर प्रवाशांची तुडुंब गर्दी असते. हे प्रवासी घामाघुम होत लोकलची वाट पाहत उभे असतात. फलाट क्रमांक चारवरून अनेक भाजी, दूध विक्रेते प्रवास करतात. अगोदरच अवजड भाजीचे बोजे, दुधाच्या किटल्या उचलून उन्हाने घामाघुम झालेले हे विक्रेते हातामधील टॉवेलच्या साहाय्याने स्वताला हवा घालत फलाटावर बसलेले असतात. रेल्वे प्रशासनाने डोंबिवली रेल्वे स्थानकातील फलाट क्रमांक तीन आणि चारवरील कल्याण दिशेकडील बाजुला पंखे बसविण्याची तत्परता दाखवावी, अशी मागणी प्रवाशांकडून करण्यात येत आहे.

# बागेश्वरधाम आयोजकांकडून नियमांचे उल्लंघन – तीन गुन्हे दाखल

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** बागेश्वर धामचे धीरेंद्र शास्त्री यांच्या कार्यक्रमांचे आयोजन भिवंडी शहरात करण्यात आले आहे. या कार्यक्रमात सर्रास नियमांचे उल्लंघन सुरू आहे. या कार्यक्रमाचे आयोजक रुद्रप्रताप त्रिपाठी यांच्याविरोधात ध्वनीप्रदूषण अधिनियमनांतर्गत गुन्हे दाखल झाले आहेत. आतापर्यंत नारपोली पोलीस ठाण्यात तीन गुन्हे दाखल असून वांरवार नियमांचे उल्लंघन करणाऱ्या या आयोजकांवर पोलीस कठोर कारवाई करणार का असा प्रश्न उपस्थित होत आहे.



भिवंडी येथील हायवे दिवे भागात बागेश्वर धाम चॅरिटेबल ट्रस्ट या संस्थेच्या वतीने बागेश्वर धामचे मठाधिपती धीरेंद्र शास्त्री यांच्या कार्यक्रमांचे आयोजन ५ ते ११ एप्रिल पर्यंत सुरू आहे. या कार्यक्रमात दररोज हजारो महिला-पुरुष सहभागी होत आहेत. येथे कथा वाचनाचे कार्यक्रम होतात. कायदा आणि सुरक्षेच्या दृष्टीकोनातून पोलिसांचा या ठिकाणी बंदोबस्त असतो. या बंदोबस्ताचे देखरेख अधिकारी म्हणून भिवंडी परिमंडळाचे पोलीस उपायुक्त डॉ. मोहन दहीकर, साहाय्यक पोलीस आयुक्त सचिन सांगळे म्हणून नियुक्त आहेत. येथे नारपोली पोलीस आणि इतर पोलीस बंदोबस्तासाठी नेमले आहेत. या कार्यक्रमात ध्वनी क्षेपक बसविण्यात आले आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार, रात्री १० ते सकाळी ६ यावेळेत वाद्य वाजविण्यास मनाई आहे. असे असतानाही रात्री उशीरापर्यंत येथे ध्वनी क्षेपक सुरु होते. त्यामुळे पोलिसांसमोरच सर्वोच्च न्यायालयाच्या नियमांचे उल्लंघन सुरु होते. गुरुवारी देखील अशाचप्रकारे कार्यक्रम सुरू करुन ध्वनी क्षेपक रात्री उशीरापर्यंत सुरु होते. त्यामुळे ध्वनी प्रदूषण झाले होते. पोलिसांनी ध्वनी मापक यंत्रणांद्वारे तपासणी केली असता, ध्वनीची तीव्रता अधिक होती. तसेच रात्री १२.१५ वाजेपर्यंत हा कार्यक्रम सुरू होता. या प्रकरणात नारपोली पोलीस ठाण्यात महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम १३५, ३७(१), ध्वनी प्रदूषण (नियम आणि नियंत्रण) नियम २००० चे कलम ५ आणि भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १८८ अंतर्गत गुन्हा दाखल आहे. यापूर्वी देखील आदेशाचे उल्लंघन झाले होते. या प्रकरणातही अशाच प्रकारे गुन्हे दाखल आहेत. त्यामुळे नारपोली पोलीस ठाण्यात आतापर्यंत तीन गुन्हे दाखल केले आहेत. पोलिसांनीच हे गुन्हे दाखल केले आहेत. हे गुन्हे आयोजक रुद्रप्रताप त्रिपाठी याच्याविरोधात हे गुन्हे दाखल आहेत. पोलिसांकडून आता आयोजकावर काय कारवाई होणार याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे.

# वसई विरारमधील ग्रामपंचायत सरपंचपदाची आरक्षणे जाहीर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वसई:** वसईत ३१ ग्रामपंचायतींच्या सरपंचपदाची आरक्षणे नुकताच वसई तहसीलदार कार्यालयात जाहीर करण्यात आली. १२ ग्रामपंचायती या बिगर अनुसूचित क्षेत्रासाठी राखीव असून अन्य १९ ग्रामपंचायती या अनुचित जमातीसाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत.

विशेषतः १० ग्रामपंचायत मध्ये अनुसूचित जमातीसाठी महिला आरक्षण पडले आहे. २०२५-३० या दरम्यान घेण्यात येणाऱ्या निवडणुकीसाठी हे सरपंच आरक्षण जाहीर केले आहे. वसई तालुक्यात ३१ ग्रामपंचायती असून त्यापैकी १९ ग्रामपंचायत या अनुसूचित क्षेत्रात मोडतात. यापैकी १० ग्रामपंचायती अनुसूचित जमातीतील महिलांसाठी राखीव झाल्या असून सकवार, टिवरी, चंद्रपाडा, टोकरे, मालजीपाडा, तिल्हेर, पोमण, शिरवली, खानिवडे, भाताणे या १० ग्रामपंचायतीचा समावेश आहे तर उर्वरित ९ ग्रामपंचायती या अनसूचित जमातीतील पुरूषांसाठी राखीव झाल्या आहेत असून यात मेढे, माजिवली-देपीवली, आडणे-भिनार, पारोळ, करंजोण, नागले, शिवणसई, उसगाव, सायवन या ९ ग्रामपंचायतींचा समावेश आहे. तसेच १२ ग्रामपंचायती बिगर अनुसूचित क्षेत्रासाठी राखीव ठेवण्यात आली आहेत.

# वारंवार बत्तीगुलच्या समस्येमुळे कल्याण पूर्वेतील नागरिकांचा महावितरणाला जन आंदोलनाचा इशारा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण पूर्वेतील रामनगर, महात्मा फुले नगर, मस्जिद रोड, सुचकनाका परिसरात गेल्या अनेक वर्षांपासून वारंवार वीज पुरवठा खंडित होण्याच्या समस्येने विद्युत् ग्राहक नागरिक हैराण झाले आहेत. वारंवार पत्रव्यवहार, तक्रार करून काही काळ सुरळीत चालते. आणि समस्या जैसे थे राहते, ही समस्या महावितरणने मार्गी लावण्याबाबत सामजिक कार्यकर्ते मनोज वाघमारे यांनी महावितरणला पत्राद्वारे साकडे घातले आहे.

कल्याण पूर्वेतील, रामनगर, महात्मा फुले नगर, मस्जिद रोड, सुचकनाका येथील वीजपुरवठा बारा ते पंधरा वर्षांपासून सतत खंडित होत असून यासंदर्भात तक्रार देखील करण्यात आली होती. परंतु पुन्हा काही वर्षांनी वीजपुरवठा खंडित होण्याचे सत्र सुरू झाले असून यामुळे विद्युत् ग्राहक नागरिकांना रात्री दिवसाही त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे या परिसरात वीजपुरवठा सुरळीत होण्यासाठी जुने कंन्डक्टॅर, एच.आर.सी.फेज व सतत वीजपुरवठा खंडित होण्यास कारणीभूत असलेली उपकरणे त्वरित बदली करून ग्राहकांना वीजपुरवठा खंडित होण्याच्या समस्येपासून मुक्ती मिळावी. असे न झाल्यास जन आंदोलन करण्याचा इशारा सामाजिक कार्यकर्ते मनोज वाघमारे यांनी महावितरणचे कार्यकारी अभियंता यांना पत्राद्वारे दिला आहे.

# कल्याणमधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर ज्ञान केंद्र होणार खुले


दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवनप्रवास, त्यांचे साहित्य, त्यांची आंदोलने आणि विचार होलोग्राफीसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून अनुभवण्याची संधी नागरिकांना उपलब्ध होणार आहे. कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या प्रयत्नाने कल्याण डोंबिवली महापालिकेच्या 'ड' प्रभाग कार्यालयाशेजारी उभारण्यात आलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकातील ज्ञान केंद्राचे लोकार्पण येत्या रविवारी १३ एप्रिल रोजी होणार आहे. दुसऱ्या टप्प्यातील ज्ञान केंद्रात शेकडो पुस्तके असलेले ग्रंथालय, चित्र, दृकश्राव्य (डिजीटल) रूपाने मांडण्यात आलेला डॉ. बाबासाहेबांचा जीवनप्रवास अनुभवता येणार आहे. हे देशातील एकमेव असे अत्याधुनिक ज्ञान केंद्र ठरणार आहे.

कल्याण लोकसभा मतदारसंघातील कल्याण पूर्व भागात आंबेडकरी अनुयायांची संख्या मोठी आहे. या परिसरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्य स्मारक व्हावे अशी स्थानिकांची मागणी होती. त्यासाठी कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी प्रयत्न सुरू केले होते. यासाठी जागा आवश्यक होती. 'ड' प्रभाग समितीच्या परिसरात जागा होती. मात्र त्यावर प्रभाग समितीचे आरक्षण होते. त्यामुळे हे आरक्षण बदलण्यासाठी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी तत्कालीन नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे पाठपुरावा केला. अखेर ३ नोव्हेंबर २०२१ रोजी 'ड' प्रभाग समिती कार्यालयाच्या जागेवरील १३०० चौरस मीटर क्षेत्राचे आरक्षण क्रमांक ४२३ हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकासाठी बदलण्यात आले. विशेष म्हणजे डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या प्रयत्नाने विक्रमी वेळेत आरक्षण बदलाचा निर्णय झाला होता. त्यापूर्वीच यासाठी ५ कोटींचा निधी एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून उपलब्ध झाला होता. या निर्णयानंतर ८ कोटी ७४ लाखांचा निधी मंजूर करण्यात आला होता. त्यानंतर १२ एप्रिल २०२२ रोजी तत्कालिन नगरविकास तथा ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत या स्मारकाच्या कामाचे भूमीपूजन पार पडले. त्यानंतर या स्मारकाच्या कामाचे काम सुरू झाले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा भव्य पुतळा आणि ज्ञान केंद्र, ज्यात भव्य ग्रंथालय, होलोग्राफीच्या माध्यमातून थेट डॉ. बाबासाहेब आंबेडकर संवाद साधत असल्याचा आधुनिक प्रयोग या स्मारकात केला जाणार होता. त्यानुसार १० मार्च २०२४ रोजी राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते या स्मारकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्य पुतळयाचे लोकार्पण करण्यात आले होते. दुसऱ्या टप्प्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर ज्ञान केंद्र, भव्य ग्रंथालय आणि होलोग्राफी दालनाचे काम नुकतेच पूर्ण झाले असून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या पूर्वसंध्येला १३ एप्रिल रोजी याचे लोकार्पण संपन्न होणार आहे.

रविवारी १३ एप्रिल रोजी सायंकाळी ७ वाजता कल्याण पूर्वेतील 'ड' प्रभाग कार्यालयाच्या आवारातील स्मारकात हा दिमाखदार सोहळा संपन्न होणार असल्याची माहिती खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी दिली आहे. यावेळी राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत, सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाठ यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहे. यावेळी सांस्कृतिक कार्यक्रमाचेही आयोजन करण्यात आले आहे.




### महात्मा ज्योतिबा फुले जयंतीनिमित्त

## ठाणे जिल्हा परिषद येथे अभिवादन कार्यक्रम

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : थोर समाजसुधारक महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त आज, जिल्हा परिषद, ठाणे येथे अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. शिक्षण विभाग (प्राथमिक) अंतर्गत झालेल्या या कार्यक्रमात अधीक्षक बबन आनंदा गोमासे यांच्या हस्ते महात्मा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.या प्रसंगी विस्तार अधिकारी (शिक्षण), सहायक प्रशासन अधिकारी, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, तसेच विभागातील सर्व कर्मचारी उपस्थित होते.

महात्मा फुले यांच्या सामाजिक कार्याचा आदर्श डोळयासमोर ठेवत, उपस्थितांनी त्यांच्या विचारांचे स्मरण करून सामाजिक समतेच्या दिशेने कार्य करण्याचा संकल्प व्यक्त केला.

### राज्य पेसा संचालकांचा

## ठाणे जिल्ह्यात पेसा क्षेत्रातील ग्रामपंचायतींचा दौरा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /ठाणे : दिनांक 08 व 09 एप्रिल, 2025 रोजी, राज्य पेसा कक्ष, ग्राम विकास विभाग, पुणे येथील संचालक शेखर शंकर सावंत यांच्या अध्यक्षतेखाली ठाणे जिल्ह्यातील पेसा क्षेत्रातील ग्रामपंचायतींचा क्षेत्रीय दौरा यशस्वीरित्या पार पडला.यामध्ये जिल्हा परिषद, ठाणे येथे आढावा बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीस उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) प्रमोद काळे, राज्य पेसा समन्वयक अतुल गाडे, जिल्हा व्यवस्थापक संजय धसाडे, सर्व तालुका व्यवस्थापक (पेसा) तसेच इतर संबंधित अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत पेसा कायदा 1996 अंतर्गत तयार करण्यात आलेल्या पेसा नियमांची अंमलबजावणी, तसेच पेसा 5% थेट निधी बाबत सविस्तर आढावा घेण्यात आला आणि अंमलबजावणी प्रक्रियेतील अडचणी व उपाययोजना यावर चर्चा करण्यात आली. या दौरा दरम्यान ग्रामपंचायत शिरोळ (ता. शहापूर) येथे क्षेत्रीय भेट घेण्यात आली. यावेळी ग्रामस्थांनी पारंपरिक आदिवासी नृत्य सादर करून संचालकांचे स्वागत केले. यानंतर ग्रामसभा, विविध समित्यांसोबत संवाद साधून पेसा कायद्याच्या अंमलबजावणी संदर्भात मार्गदर्शन करण्यात आले. तसेच 5% थेट निधी योजनेअंतर्गत ग्रामनिहाय दप्तर तपासणी व प्रत्यक्ष कामांची पाहणी देखील करण्यात आली.यानंतर ग्रामपंचायत कसारा खुर्द येथे भेट देऊन संचालक यांनी ग्रामसभा कोष समिती सदस्यांसह चर्चा केली. या वेळी संबंधित योजनेचे सर्व अभिलेख, नोंदवह्या आणि प्रत्यक्ष कामांची तपासणी करण्यात आली. या दौऱ्यात गटविकास अधिकारी कल्याण पंडित राठोड, तालुका स्तरीय विस्तार अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. हा दौरा पेसा कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीस चालना देणारा ठरला असून, पेसा क्षेत्रातील विकास प्रक्रियेला बळकटी देण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरला आहे.

# ठाणकर पाडा प्रभागात रस्त्याच्या काँक्रीटीकरणाच्या कामाला सुरवात

### माजी नगरसेवक तथा शिवसेना उपशहर प्रमुख मोहन उगले यांच्या पाठपुराव्याला यश

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण पश्चिमेतील ठाणकर पाडा प्रभागात आमदार विश्वनाथ भोईर यांच्या आमदार निधीतून प्रभाग क्रमांक 29 ठाणकर पाडा परिसरातील महावीर जैन स्कुल ते शंकर काँलनी टेलिफोन कार्यालयापर्यन्त सिमेंट काँक्रीटीकरण रस्त्यासाठी निधी मंजूर करण्यात आला आहे. शिवसेना उपशहर प्रमुख तथा स्थानिक माजी नगरसेवक मोहन उगले यांनी या कामासाठी सातत्याने पाठपुरावा केला होता. आमदार विश्वनाथ भोईर यांचे सुपुत्र वैभव भोईर यांच्या हस्ते



### आमदार विश्वनाथ भोईर यांच्या निधीतून होणार रस्त्याचे काम

या विकास कामांचा शुभारंभ करण्यात आला.

यावेळी शिवसेनेचे उपशहर प्रमुख व माजी नगरसेवक मोहन उगले, विभाग प्रमुख अनंता पगार, उपविभाग प्रमुख स्वप्निल मोरे, शाखा प्रमुख नितीन कदम, शरद आव्हाड, उपशाखा प्रमुख उमेश भुजबळ, महिला शहर संघटक नेत्रा उगले, उपशहर प्रमुख कल्पना जमदाडे, आशा रसाळ, महिला शाखा प्रमुख ज्योती पाटील, भारती पवार यांच्यासह ठाणकर पाडा परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपशहर प्रमुख व माजी नगरसेवक मोहन उगले यांनी सांगितले की आमदार विश्वनाथ भोईर यांच्या निधीतून 70मीटर रस्ता सिमेंट काँक्रीटीकरणाचा बनविला होता, व उर्वरीत रस्ता बाकी होता. तो देखिल रस्ता पूर्ण करण्याचे काम मोहन उगले हे करतील यासाठी येथील रहिवाशांनी मोहन उगले यांच्याकडे वारंवार विचारणी केली होती. उगले यांनी आमदार विश्वनाथ भोईर यांच्या कडे रस्त्याच्या कामाच्या बाबत निधीची मागणी केली. त्या प्रमाणे आमदार निधीतून सिमेंट काँक्रीटीकरण रस्त्याच्या साठी निधी मंजूर करण्यात आला व लगेच कामाला सुरुवात करण्यात आली आहे. मतदारांनी आपल्याला निवडून दिले आहे, आपल्यावर विश्वास ठेवला आहे, त्या प्रमाणे विकास कामे केली पाहिजेत, नेत्यांनी कार्यकर्त्यांना सहकार्य केले पाहिजे, म्हणजे कार्यकर्ते मोठे झाले तर नेतेही मोठे होतील असे सांगितले.

### जनसेवा प्रतिष्ठान मुरबाड आयोजित

# रोजगार मेळाव्यात तरुणांना नोकरीची संधी उपलब्ध

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : मुरबाड तालुक्यात गेली बरेच वर्षापासून जनसेवा प्रतिष्ठान मार्फत विविध कार्यक्रम राबवून सातत्याने नागरिकांच्या समस्या सोडवण्याचे काम जनसेवा प्रतिष्ठान करत आहे त्याच धर्तीवर गुरुवारी मुरबाड -कल्याण राष्ट्रीय महामार्ग असलेल्या शिवळे येथील व्हाईट हाऊस येथे जनसेवा प्रतिष्ठान मुरबाड आयोजित आवसर येच. आर. सर्व्हिस कंपनीच्या माध्यमातून फ्लिपकार्ट कंपनीमध्ये मुरबाड तालुक्यातील गरजू सुशिक्षित बेरोजगार तरुणाना



उत्तम रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यासाठी रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला . या रोजगार मेळाव्याला तालुक्यातून जोरदार प्रतिसाद मिळाला.

सदर रोजगार मेळाव्यात १२१ तरुणांना नोकरीची संधी उपलब्ध करुन दिली. तसेच येण्या जाण्यासाठी बस सेवा उपलब्ध करून दिली आहे . जनसेवा प्रतीष्ठान मुरबाडचे अध्यक्ष सुभाष पवार, त्यांच्या समवेत रामभाऊ दळवी (आण्णा), धनाजी दळवी, मोहन भावार्थे, रघुनाथ इसामे, बळीराम आगिवळे, बळीराम म्हाडसे, सागर कडव सर्व रोजगार मेळव्यातील सदस्य उपस्थित होते.

याकामासाठी टिएल आर्यन दुबे, एचआर शाहीद शेख, विकास पांडे, आल्फिया खान, जयश्री गायकवाड यांचे सहकार्य लाभले. या रोजगार मिळवले जवळपास १२१ तरुणांना नोकरी संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल जनसेवा प्रतिष्ठानचे सर्वत्र आभार व अभिनंदन होत आहे.

### मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील

## खारपाडा ते कशेडी पर्यत अवजड वाहनांस वाहतूक बंदी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : रायगड किल्ला येथे श्री छत्रपती शिवाजी महाराज यांची ३४५वी पुण्यतिथी अभिवादन कार्यक्रम 12 एप्रिल रोजी आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाकरीता नागरिक हे आपआपली वाहने घेवून हजारोंच्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. या काळात अपघात व वाहतुक कोंडी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील खारपाडा ते कशेडी पर्यत जड-अवजड वाहनांमुळे जागोजागी वाहतूक कोंडी होऊ नये म्हणून १२एप्रिल २०२५ रोजी सकाळी ००.०१ ते दुपारी १५.०० वाजेपर्यत मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील खारपाडा ते कशेडी पर्यत जड-अवजड वाहनांस वाहतूक बंदी करण्याची अधिसूचनेव्दारे आदेश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी पारित केले आहेत.

सदरची वाहतूक बंदी अधिसूचना ही दुध, पेट्रोल, डिझेल, स्वयंपाकाचे गॅस, औषधे, ऑक्सीजन, भाजीपाला इत्यादी जिवनावश्यक वस्तू वाहून नेणारी वाहने, पोलीस वाहने, फायर ब्रिगेड वाहने रुग्णवाहीका, तसेच महिला सशक्तीकरण अभियान कार्यक्रमासाठी येणारी वाहने यांना लागू राहणार नाही असेही जिल्हाधिकारी यांनी आदेशात स्पष्ट केले आहे.

### मुरबाड मध्ये सिद्धार्थ युवक मित्र मंडळाकडून

## भीम महोत्सवाचे आयोजन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : भारतीय संविधानाचे निर्माते महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीचे औचित्य साधून मुरबाड या बाबासाहेबांच्या आजोली १२ ते १४ एप्रिल असं सलग तीन दिवस भव्यदिव्य भीम महोत्सवाचे आयोजन सिद्धार्थ युवक मित्र मंडळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर यांनी केले आहे.

या भीम महोत्सवात अनेक उपक्रम राबविण्यात येणार असून या भीम उत्सवाला मुरबाड तालुक्यातील तमाम जनतेने उपस्थित राहण्याचे आवाहन सिद्धार्थ युवक मित्र मंडळाचे अध्यक्ष तथा आरपीआय आठवले पक्षाचे शहर शहराध्यक्ष कैलास देसले व मुरबाड नगरपंचायती माजी नगरसेवक तथा स्वच्छता आरोग्य सभापती रवींद्र देसले यांनी केली आहे.

लोकनेते भाऊसाहेब देसले संस्थापक अध्यक्ष असलेल्या सिद्धार्थ युवक मित्र मंडळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर,, मुरबाडचे यंदाचे सलग ४७ वर्ष असून २०२५ चा भीमजयंतीचा कार्यक्रम भीम महोत्सव म्हणून साजरा करीत आहेत. या भीम महोत्सवाला भिवंडी लोकसभेचे खासदार सुरेश(बाळ्या मामा) म्हात्रे, आमदार किसन कथोरे माजी आमदार गोटीरामभाऊ पवार, सिडकोचे माजी अध्यक्ष प्रमोद हिंदुराव, यांच्यासह आंबेडकर चळवळीतील नामवंत मान्यवर, आरपीआय आठवले पक्षाचे वरिष्ठ पदाधिकारी ,मित्र पक्ष सर्वच राजकीय पक्षाचे सर्व मंडळी उपस्थित राहणार आहेत.

### कल्याण येथे

## चर्मकार समाज वधू वर मेळावा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : सर्वांना एकाच छताखाली स्थळे मिळून वेळ आणि पैशाची बचत व्हावी ह्या हेतूने रविवारी चर्मकार समाज वधू वर परिचय मेळाव्याचे कल्याण येथे आयोजन करण्यात आले असून चर्मकार समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

रविवार दिनांक १३ एप्रिल रोजी कल्याण पश्चिम येथील महापालिका मुख्यालयासमोर, शंकर राव चौक, स्वामी नारायण हॉल येथे सकाळी १० ते २ वाजेपर्यंत चर्मकार समाज वधू वर परिचय मेळावा आयोजित करण्यात आला असून महापालिकेचे माजी कार्यकारी अभियंता श्री .किरण वाघमारे यांच्या हस्ते उदघाटन करण्यात येणार असून ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते जगन्नाथ गायकवाड , सोपान इंगळे, डॉ. हेमंत काटकर, महेश भोईर इत्यादी मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असून अधिक माहितीसाठी मेळाव्याचे आयोजक अनिल काकडे यांना 8104211818 किंवा 9324552963 ह्या भ्रमण ध्वनी वर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे




# ठाणे जिल्ह्यात 'Door Step Delivery' उपक्रमांतर्गत ३०२ नागरिकांना मिळाली घरपोच सेवा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : ठाणे : सामान्य नागरिकांना सरकारी सेवा मिळवण्यासाठी कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागू नयेत, यासाठी ठाणे जिल्हा परिषदेने १०० दिवसांचा कृती कार्यक्रम अंतर्गत एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. 'Door Step Delivery' नावाची अभिनव सेवा प्रणाली आता जिल्ह्यातील ४३१ ग्रामपंचायतींमध्ये कार्यान्वित करण्यात आली आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी 'Door Step Delivery' उत्तम प्रकारे शासकीय सेवा लोकांपर्यंत वेळेत पोहोचण्यासाठी मोलाचे मार्गदर्शन केले आहे.

"सर्वसामान्य नागरिकांना त्यांच्या दारी सेवा उपलब्ध करून देणे, हेच खऱ्या अर्थाने सुशासनाचे प्रतीक आहे. 'Door Step Delivery' उपक्रमाद्वारे आम्ही प्रशासन आणि जनतेतील अंतर कमी करत आहोत. हा उपक्रम प्रत्येक गावात, प्रत्येक घरापर्यंत पोहोचवण्याचा आमचा संकल्प आहे." - मुख्य कार्यकारी अधिकारी, रोहन घुगे

या प्रणालीद्वारे नागरिकांना घरबसल्या २५ प्रकारच्या शासकीय सेवा मिळू शकतात. प्रायोगिक तत्त्वावर सुरू झालेल्या या उपक्रमाला नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. आतापर्यंत ४०४ अपॉईंटमेंट नोंदवण्यात आल्या असून, ३०२ नागरिकांना घरपोच सेवा देण्यात आली आहे. उर्वरित अपॉईंटमेंटवर काम सुरू असल्याबाबतची माहिती जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) प्रमोद काळे यांनी दिली.

या उपक्रमामार्फत मिळणाऱ्या प्रमुख सेवा:

मृत्यू दाखला, जन्म दाखला, दारिद्र्यरेषेखालील दाखला, ग्रामपंचायतीचा येणे बाकी नसल्याचा दाखला, विवाह नोंदणी दाखला, नमुना नं ८ चा दाखला (मालमत्ता फेरफार), निराधार योजनेसाठी वयाचा दाखला हे सर्व लोकहक्क सेवा आयोगांतर्गत येणारे हे सात दाखले 'Door Step Delivery' मार्फत देण्यात येत असून त्या व्यतिरिक्त इतर विभागाचे जसे जातीचा दाखला, अधिवास प्रमाणपत्र, नॉन-क्रिमिलेयर प्रमाणपत्र, उद्योग आधार, जीवन प्रमाणपत्र, शिष्यवृत्ती अर्ज, पॅनकार्ड व दुरुस्ती, पासपोर्टसाठी शपथपत्र, अधिवास प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र, शेत मोजणी अर्ज, चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र, राजपत्र प्रकाशन, १५ वर्षाचे रहवासी प्रमाणपत्र, खाद्य परवाना जीवन प्रमाणपत्र, हयात प्रमाणपत्र, आभाकार्ड (आयुष्यमान भारत आरोग्य खाते ) अशा विविध सेवा या प्रणालीद्वारे घरपोच मिळू शकतात.

ग्रामपंचायतींच्या केंद्रचालक यांना ही जबाबदारी दिली आहे. केंद्रचालक नागरिकांकडून वेळ ठरवून त्यांच्या घरी येतात, आवश्यक कागदपत्र स्कॅन करतात आणि ऑनलाइन सेवा प्रक्रिया पूर्ण करतात. सेवा मंजूर झाल्यावर संबंधित प्रमाणपत्र पुन्हा घरपोच पोचवले जाते.

अपॉईंटमेंट व मदतीसाठी:

नागरिकांनी https://thanedoorstep.in/ या संकेतस्थळावरून अपॉईंटमेंट घ्यावी.किंवा मदतीसाठी हेल्पलाईन क्रमांक 8380822333 वर संपर्क साधावा. ठाणे जिल्हा प्रशासनाकडून सुजाण नागरिकांना घरीच जलद व सुलभ सेवा देण्याचा प्रगत उपक्रम यशस्वीपणे राबवण्यात येत आहे.

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - अॅड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024